**SAMPLE QUESTION PAPER**

**2016-17**

**CLASS – X**

**वेळ –3 तास** **MARATHI मराठी** **गुण : 90**

**Section A (Comprehension)**

प्र. १. खालील उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.

भारत देश म्हणजे पृथ्वीचा मुकुटमणी आहे. त्यामध्ये संपत्तीचे विपुल भांडार आहे. सगळे महत्त्वाचे धातू भारतात सापडतात. गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी, कावेरी आणि नर्मदा आपल्या अमृतजलाने त्याच्या भूमीचे सिंचन करतात. येथील कसलेल्या जमिनीत सदैव सोने पिकते. ऋतूंचे चक्र सदैव मनाला आकृष्ट करते. भारतभूमीच्या आकर्षणाने विदेशी लोक नेहमीच आकर्षित होतात. अनेक विदेशी लोकांनी येथे कोणत्या ना कोणत्या निमित्ताने येऊन ज्ञान आणि वैभव प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. अनेक महापुरूषांनी येथे जन्म घेऊन मानवतेचा बोध केला. रामाची मर्यादाशीलता, कृष्णाचा कर्मयोग, गौतमाची अहिंसा, युधिष्ठिराचा धर्म, कर्णाची दानशूरता, अर्जूनाचे युध्दकौशल्य आणि महावीराची करूणा ही जीवनचरित्र्याच्या आदर्शांची अनुपम उदाहरणे आहेत. भारताचा इतिहास गौरवाच्या सर्वोच्च शिखरावर पोचलेला होता. नालंदा आणि तक्षशिला यांसारखी विद्यापीठे ज्ञान आणि विज्ञानाच्या अध्ययनाची अद्भुत केंद्रे होती. पाणिनीसारखे वैय्याकरण आणि चाणक्यासारखे अर्थशास्त्रज्ञ व राजकारणपटू तक्षशीला विद्यापीठाचेच अध्यापक होते. जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ वेद, उपनिषदे आणि गीता यांची निर्मिती भारतामध्येच झाली. व्यास, भवभूती, कालिदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, तुलसीदास यांसारख्या प्रतिभावंतांनी आपल्या काव्यवैभवाने जगाला विस्मित केले.

१) ‘ विपुल ’ या शब्दाचा समानार्थी शब्द सांगा. १

अ) कमी   ब) थोडके   क) खूप

२) भारत देश कुणाचा मुकुटमणी आहे? १

३) भारतामध्ये नैसर्गिक संपत्तीचे विपुल भांडार कोणते आहे? ३

४) भारतामध्ये कोण-कोणत्या महापुरूषांनी जन्म घेतला व भारताला वैभव संपन्न बनविले? ३

प्र. २. खालील उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.

मला स्थळापेक्षा माणसे अधिक आवडतात आणि माणसापेक्षा पुस्तकातील काही स्थळे आवडतात. खूप आवडतात; पण बहुदा तेथील अनुभव आणि त्यांच्या आठवणी माझ्या आवडत्या माणसांशी जोडल्या गेल्या आहेत म्हणून निर्मनुष्य निसर्ग मला फार आवडत नाही, झेपत नाही. मला वर्डस्वर्थप्रमाणे निर्भेळ निसर्गाच्या सान्निध्यात सोडले तर थोडा वेळ मन रमेलही पण मग माणसांची आठवण येईल, ओढ येईल आणि माणसे मिळाली नाहीत तर मी एखादे सुंदर पुस्तक घेऊन बसेन. त्या देखण्या निसर्गाच्या सहवासातसुद्धा माणसापेक्षा पुस्तके आवडतात याचे कारण या पुस्तकात माणसे असतात अगदी निवडक

आणि गाळीव. प्रत्यक्ष जीवनात माणसातल्या ज्या उणिवा मला बोचतात त्या या माझ्या निवडक पुस्तकातल्या माणसात नसतात आणि म्हणून पुस्तकातल्या या माणसांनी मला जन्मभर साथ दिली आहे. धकाधकीच्या जीवनात धक्के मिळाले म्हणजे मी माझ्या पुस्तकांकडे वळतो. तेथे प्रांजळ आचार व भावना मिळतात. प्रेरणा मिळतात पण हेही सर्वस्वी खरे नाही. आवडते माणूस आणि आवडते पुस्तक यामध्ये निवड करण्याचे प्रसंग आले म्हणजे पुस्तक खाली पडते आणि माणसाचा हात मी पटकन धरतो. त्यांच्यात ऊब असते आणि ती मला जाणवते. पण पुस्तकच आपला खरा मित्र आहे.

१. 'पुस्तक' या शब्दाचे लिंग खालील पैकी कोणते? १

    १. पुल्लिंग
    २. स्त्रीलिंग
    ३. नपुसकलिंग

२. लेखकाचा खरा मित्र कोणता आहे ? १

३. लेखकाला स्थळे का आवडतात? २

४. पुस्तके आवडण्याचे कोणते कारण लेखकाने सांगितले आहे ? ३

## Section B

प्र. ३.खालील पैकी कोणत्याही विषयावर २० ते २५ ओळी निबंध लिहा. १०

    १. स्वच्छ भारत - सुंदर भारत
    २. सैनिकाचे मनोगत
    ३. जनसेवा हिच ईश्वरसेवा

प्र. ४. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. ५

रमेश/रेवती कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी, ज्ञानदीप विद्यालय, वरळी, मुंबई-३१ येथून शाळेसमोरील रस्ता नादुरूस्त असल्याविषयी विभागीय अधिकारी मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना तक्रार पत्र लिहितो/लिहिते.

किंवा

अमेय/आभा वानखेडे, ग्रंथालय प्रतिनिधी, सेंट जॉन हायस्कूल, नागपूर हा/ही शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र सेंट्रल बुक डेपो, नागपूर यांना मागणी पत्र लिहितो/लिहिते.

## Section C

प्र. ५. अ) खालील प्रश्न सुचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही पाच) ५

    १. केशवने गाडीवर ताडपत्री टाकली. (विशेषनाम ओळखा)

    २. राम सात वर्षाचा होता. (विशेषण ओळखा)

३. देवळापुढे रांगोळया घातल्या होत्या. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

४. त्यांचा दिनक्रम आखीव आहे. (सर्वनाम ओळखा)

५. मी तुझ्या दुकानात उदया येईन. (क्रियाविशेषण ओळखा)

६. अरेरे! फार वाईट झाल. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

ब) कंसातील सूचनेनुसार प्रयोग बदला (कोणतेही तीन) ३

१. पारध्याने पक्षी जाळयात पकडले. (प्रयोग ओळखा)
२. बाई आम्हाला कविता शिकवतात. (प्रयोग ओळखा)
३. राम रावणाला मारतो. (भावे प्रयोग करा)
४. राधाने कुत्र्याला मारले. (कर्तरी प्रयोग करा)

क) सूचनेनुसार सोडवा. ३

१. बाबांनी श्यामचे कौतुक केले. (काळ ओळखा)

२. मोकळे हसून ते त्याचा स्वीकार करतात. (भविष्यकाळ करा)

३. प्रत्येक माणसाला कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा छंद असतो. (काळ ओळखा)

ड) लिंग बदला. २

१. कवी
२. पत्नी
३. मुले
४. आजी

इ) वचन बदला. २

१. पुस्तक
२. माणूस
३. नदी
४. गर्दी

फ) समानार्थी शब्द लिहा. १

१. गट
२. उचित

ग) विरूध्दार्थी शब्द लिहा. १

१. दुःख

२. शक्य

ज) वाक्प्रचारांचा खालील वाक्यांमध्ये योग्य वापर करा. २

(धीर येणे, मूठमाती देणे)

१. डॉ. आंबेडकर यांनी समाजातील अंधश्रध्दा नष्ट केल्या.
२. सावित्रीबाई फुल्यांच्या कार्यामुळे स्त्रियांची भीती कमी झाली.

ह) अचूक शब्द ओळखा व लिहा. १

१. अनूभूती २. अनूभुती ३. अनुभूती

**Section D**

प्र. ६. अ) खालील पैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ४

१. हो ना बाई, तुम्ही सगळया होतात, म्हणून निभवलं हो ?
२. 'वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल, हा ध्यास या पतीपत्नीला लागला.'
३. 'एक मनुष्य अखंड जेवतो आणि दुसरा सतत उपाशी राहतो हे निसर्गाला कधीच मंजूर नाही.'

ब) कंसातील योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. १

शादुद्दीन वलींना (दाजीबा/सादोबा/आजोबा) असेही म्हणतात.

प्र. ७. अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा. ८

१. उरुसाच्या संदलच्या दिवशी लेखिकेच्या घरी कोणता स्वयंपाक होई ?
२. रंगमंचावर आलेल्या पुस्तकरावाच्या पोशाखाचे वर्णन करा.
३. बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी कोणते कष्ट घेतले ?
४. निसर्गाला नित्यनव्याचा सोस असतो असे का म्हटले आहे ?

ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. २

१. कुष्ठरोगाचा अभ्यास करण्यासाठी बाबा आमटे कोठे गेले होते?
२. पन्हाळयाचा दरगाह कशाचे पवित्र स्थान आहे?
३. केशवच्या बहिणीचे नाव काय होते?
४. गोष्टीच्या पाण्यात कशाची नाव सोडायची?

प्र. ८. अ) खालीलपैकी कोणत्याही एक पद्यांशाचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. ४

१. 'सारा निसर्गच बदलावा माणसाला बदलण्यासाठी
आणि माणसाला किंमत यावी माणूस म्हणून'.
२. 'सोसून सोसून किती गं सोसावं
गिळून दुःख सारं, साऱ्या जगा पोसावं.
३. वळण वाकळया नदीत आहे खळखळते पाणी

नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी

ब) कंसातील योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. १

चिरड अन्याय, घे ------------------, बनून वाघवाघिणी गं.

(न्याय/हत्यार/कर्तव्य, हक्क)

प्र.९ अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नाांची उत्तरे ५० ते ६० शब्दात लिहा. ८

१. कवीला गावातील आमराई, नदी, शेत का आवडते?
२. प्रलय होतांना कोणकोणता बदल कवीला अपेक्षित आहे?
३. कवीने स्त्रीचे मोठेपण कसे वर्णन केले आहे.
४. कवयित्रीने एकत्वाचे कोणते विचार कवितेतून व्यक्त केले आहेत ?

ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाकयात लिहा. २

१. विभिन्नतेतही देश कोणते गीत गातो ?
२. हिरवेगार पीक कोठे नाचत आहे?
३. मातीला कशाचा सुगंध यावा?

प्र. १०. अ) खालील पठित उताऱ्यातील ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

झाड! कोणतंही असो, किती उपयोगी पडतं. फुलांच झाड असेल तर ते छान वासाची फुलं देतं. काही झाडांची मुळं उपयोगी, काही झाडांची खोड उपयोगी. काही झाडांची तर मुळं, खोड, पानं, फुलं, असं सगळंच उपयोगी. झाडं सावलीसुद्धा किती गारेगार देतात. जमितीत त्यांची मुळं मातीला घट्ट धरून ठेवतात त्यामुळे माती वाहून जात नाही, तिची धूप होत नाही. झाडांवर किती पक्षी घरटं करतात. झाडांपासून औषधंही तयार होतात म्हणे! आपल्याला झाड होता आल असतं तर सगळयांच्या किती उपयोगी पडता येईल.

'परोपकार खरा धर्म' या विषयावर आपले विचार व्यक्त करा. ४

किंवा

स्वतः झाड झाल्यावर येणारा अनुभव तुमच्या शब्दामध्ये लिहा.

ब) खालील प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा. ६

१. पंढरपूर आणि रत्नागिरी या गावांतील कोणती वैशिष्टे लेखकाने वर्णन केली आहेत?
२. कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?